# छंद पुष्परचनेचा - १४

पाश्चात्य पुष्परचना जपानी पुष्परचनांपेक्षा कशा वेगळ्या आहेत व त्याचे अगदी प्राथमिक प्रकार कोणते याची काही माहिती मार्च महिन्याच्या अंकात आपण पाहिली.

यावेळी आपण इंग्रजी **"L"** अक्षर व **"T"** अक्षराच्या आकाराच्या रचना कशा करायच्या ते पाहणार आहोत.

१. **"L"** आकाराची रचना

ही रचना करताना फ्लोरल स्पंज वापरतात. साधारण एक ते दीड फूट उंचीची रचना करायची असेल तर एक पूर्ण मोठा स्पंज आधी पाण्यात एक तास भिजवून मग वापरावा. L आकार निर्माण करण्यासाठी उंच सरळ जाणारी व लांब दांडे असणारी फुले वापरावी. ग्लाडिओली, निशिगंध, गोल्डन रॉड, कोणतीही निमुळती पाने अथवा तुरे वापरुन या रचना करता येतात.

सोबत असलेल्या फोटोमध्ये ग्लाडिओला, बांबूच्या वाळविलेल्या काड्या, जरबेरा इत्यादी साहित्य वापरले आहे. इथे फुलांच्या उंचीसाठी खास असा नियम नाही. पण हवा तो आकार रचनेला येण्यासाठी योग्य उंचीच्या प्रमाणात फुले वापरली आहेत. नेहमीप्रमाणे रंगसंगती, फुलांची निवड, पानांची निवड याचा विचार मनात असावा.





२. "T" आकाराची रचना

प्रत्यक्षात "T" अक्षर उलटे लिहिल्यावर जो आकार होतो त्या आकाराची ही रचना असते. वरील फोटोत हीच रचना दाखविली आहे. यासाठी सुद्धा फ्लोरल स्पंज वापरावा. "L" प्रकारच्या रचनेप्रमाणे फुलापानांची निवड करावी. पानाफुलांची उंची रचनेचा आकार प्रमाणात राहील या बेताने ठरवावा.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे

इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर

asdssd@gmail.com